RNI No. MAHBIL /2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ८, अंक - ३६ ] मंगळवार, डिसेंबर १७, २०१९ / अग्रहायण २६, शके १९४१ [ पृष्ठे ३

## असाधारण क्रमांक ३६

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

*आदेश*

क्रमांक पंसप-५/कावि-९६६०४/२०१९.--मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस/२०१९/प्र. क्र. २५/का-७, दिनांक १८ नोव्हेंबर २०१९ च्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या पोट-निवडणुकीच्या कार्यक्रमान्वये, तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९, पोट-कलम *(२)* च्या खंड *(अ)* चे परंतुक व महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ चा नियम ६६, पोट-नियम *(१)* व *(३)* अन्वये पुणे जिल्हा परिषद, पंचायत समिती निर्वाचक गण क्रमांक ८९-धायरी, तालुका हवेली येथून निवडून आलेल्या पंचायत समिती सदस्यांची नावे त्यांच्या कायम पत्त्यासहित याद्वारे खालीलप्रमाणे अधिसूचित करण्यात येत आहेत.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | ज्या निर्वाचक गणातून सदस्य म्हणून निवडून आले त्या निर्वाचक गणाचे क्रमांक, नाव व प्रवर्ग | निवडून आलेल्या पंचायत समिती सदस्याचे संपूर्ण नाव | कायमचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | हवेली | ८९-धायरी, तालुका हवेली, (सर्वसाधारण स्त्री) | करंजावणे सुवर्णा राजेंद्र | ९४, नांदोशी रोड, किरकटवाडी, मराठी शाळेजवळ, तालुका हवेली, जिल्हा पुणे-४११ ०२४. |

**नवल किशोर राम,**
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, १७ डिसेंबर २०१९.

---

*महाराष्ट्र जिल्हा परिषद (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२.*

**अधिसूचना**

क्रमांक पसप-५/कावि-९६६०६/२०१९.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण क्रमांक पंसनि-२०१८/ प्र. क्र. २१८ (१)/पंरा-२, दिनांक २७ नोव्हेंबर २०१९ च्या लगतच्या अधिसूचनेन्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग

(विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि महिला (अनु. जाती, अनु. जमाती व नागरिकांच्या मागास वर्गाचा प्रवर्ग यामधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील पंचायत समित्यांच्या (भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४ *(१)* अन्वये राष्ट्रपतींनी जाहीर केलेल्या अनुसूचित क्षेत्रात पूर्णत: येणाऱ्या पंचायत समित्या वगळून) सभापतींच्या पदांची संख्या विनिर्दिष्ट केलेली आहे.

त्याअर्थी, सदर दिनांक २७ नोव्हेंबर २०१९ च्या अधिसूचनेमध्ये प्रसिद्ध केलेल्या आरक्षण पदाचे अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील १३ पंचायत समित्यांच्या सभापतींची पदे दिनांक १३ डिसेंबर २०१९ रोजी घेतलेल्या सोडतीप्रमाणे खालीलप्रमाणे आरक्षण करण्यात आलेली आहेत.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | पंचायत समित्यांची नावे | सन २०१९ साठी निश्चित झालेले पंचायत समिती सभापतीपदाचे आरक्षण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | हवेली | अनुसूचित जाती महिला |
| २ | आंबेगाव | अनुसूचित जमाती |
| ३ | बारामती | नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला |
| ४ | खेड | नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला |
| ५ | इंदापूर | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ६ | जुन्नर | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ७ | पुरंदर | सर्वसाधारण महिला |
| ८ | दौंड | सर्वसाधारण महिला |
| ९ | मावळ | सर्वसाधारण महिला |
| १० | शिरूर | सर्वसाधारण महिला |
| ११ | वेल्हा | सर्वसाधारण |
| १२ | भोर | सर्वसाधारण |
| १३ | मुळशी | सर्वसाधारण |

**नवल किशोर राम,**
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, १६ डिसेंबर २०१९.

---

**वाचले.--** (१) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्रमांक रानिआ/जिपपंस/२०१९/प्र. क्र. २५/का. ७, दिनांक १८ नोव्हेंबर २०१९.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ, २८-दत्तवाड निवडणूक विभाग यांचेकडील पत्र क्रमांक जि.प.ग्रापं/ कावि-३४८/२०१९, दिनांक १३ डिसेंबर २०१९.

***आदेश***

क्रमांक कार्या-१२-अ/जिपपंस/आरआर-४९३/२०१९.--मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस/२०१९/प्र. क्र. २५/का. ७, दिनांक १८ नोव्हेंबर २०१९ च्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या पोट-निवडणुकीच्या कार्यक्रमान्वये, तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९, पोट-कलम *(२)* च्या खंड *(अ)* चे परंतुक व महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणुका घेणे) नियम, १९६२ मधील नियम ६६, पोट-नियम *(१)* व *(३)* अन्वये कोल्हापूर जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्रमांक २८-दत्तवाड, तालुका शिरोळ येथून पोट-निवडणुकीद्वारे निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्याचे नाव त्यांच्या कायम पत्त्यासहित याद्वारे पुढीलप्रमाणे अधिसूचित करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | निवडून आलेल्या सदस्याचे नाव | कायमचा पत्ता | कोणत्या पक्षातून निवडून आले | जिल्हा परिषद निवडणूक विभागाचे नाव | तालुक्याचे नाव | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | माने प्रविण दौलत | गांधी चौक, दत्तवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर पिन-४१६१०७. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. | २८ दत्तवाड | शिरोळ | अनारक्षित |

**दौलत देसाई,**
जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

कोल्हापूर, १७ डिसेंबर २०१९.

---

क्रमांक निवडणूक/जि.प.पं.स./आरआर-८२८/२०१९.--महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९ व पोट-कलम *(२)* महाराष्ट्र जिल्हा परिषद निवडणूक नियम, १९६२ चा नियम ६६, पोट-कलम *(१)* अन्वये सांगली जिल्हा परिषद निवडणूक विभागातून निवडून आलेल्या सर्व सभासदांची नावे त्यांच्या कायम पत्त्यासहित याद्वारे खालीलप्रमाणे प्रसिद्ध करणेत येत आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | तालुका | जि.प. निवडणूक विभागाचा क्रमांक | जि.प. निवडणूक विभागाचे नाव | आरक्षण | निवडून आलेल्या सभासदांची नावे | कायमचा पत्ता | पक्ष/आघाडी/ फ्रंटचे नाव अथवा अपक्ष | उमेदवाराची निशाणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | तासगाव | २२ | सावळज | सर्वसाधारण | पाटील सागर चंद्रकांत | मु. पो. सावळज, ता. तासगाव, जि. सांगली. | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | घड्याळ |
| २ | शिराळा | ४८ | कोकरूड | सर्वसाधारण | देशमुख संपतराव गुलाबराव | मु. पो. कोकरूड, ता. शिराळा, जिल्हा सांगली. | भारतीय जनता पार्टी | कमळ |

**डॉ. अभिजित चौधरी,**
जिल्हाधिकारी, सांगली.

सांगली, १३ डिसेंबर २०१९.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.